# वसई विरार शहर महानगरपालिका

मा. सर्वसाधारण सभा दिनांक १९/०६/२०१७

सायं ४.३० वा.

| अनु. क्र. | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. सर्वसाधारण सभा दि. २०/०५/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. सर्वसाधारण सभा दि. २०/०५/२०१७ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहेत.<br>अनुमोदक :- (रूपेश जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव दुरुस्तीसह सर्वानुमते मंजूर. |
| २. | प्रश्नोत्तरे | ठराव :- निरंक |
| ३. | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव | ठराव : - निरंक |
| ४. | श्री. अनिल बाबू जाधव, वरिष्ठ लिपिक,प्रभाग समिती - जी, वालीव यांचे विरुध्द अँटी करप्शन ब्युरो, ठाणे यांनी फौजदारी गुन्हा दाखल केल्याने त्यांना सेवेतून निलंबित केल्याबाबत. | ठराव/निर्णय :- श्री. अनिल बाबू जाधव, वरिष्ठ लिपिक यांनी मालमत्ता कर आकारणीसाठी लाचेची मागणी केल्याचे अँटी करप्शन ब्युरो, ठाणे यांचे पडताळणीत निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द वालीव पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं. π १०/२०१७, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७ प्रमाणे दि. ०७ एप्रिल, २०१७ रोजी गुन्हा दाखल केला आहे. श्री. जाधव यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल झाल्याने प्रशासनाने त्यांना सेवेतून निलंबित केले असून कलम ५६ (१) (ब) नुसार प्रस्ताव महासभेच्या अवलोकनार्थ सादर केला आहे. प्रशासनाने या प्रकरणी आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी, असा निर्देश ही महासभा देत आहे.<br>अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ५. | श्री. प्रदिप परशुराम पाटील, अधिक्षक, प्रभाग समिती - एफ, धानीव-पेल्हार यांना अँटी करप्शन ब्युरो, पालघर यांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात अटक झाल्याने सेवेतून निलंबित केल्याबाबत. | ठराव/निर्णय :- श्री. प्रदिप परशुराम पाटील, अधिक्षक, प्रभाग समिती - एफ, धानीव-पेल्हार यांचे प्रकरणी प्रशासनाने निदर्शनास आणलेल्या बाबींचे अवलोकन करण्यांत आले. श्री. पाटील यांना रु. १०,०००/- ची लाच स्विकारतांना अँटी करप्शन ब्युरो यांनी रंगेहात पकडून त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंध कायदा, १९८८ चे कलम ७,१२,१३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे वालीव पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र. π ०१/२०१७ नोंद करुन दि. ०२ जानेवारी, २०१७ रोजी अटक केली. त्यांना दि. ०५ जानेवारी, २०१७ पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली होती. श्री. पाटील यांचे फौजदारी गुन्ह्याच्या |

| | | |
|---|---|---|
| | | अनुषंगाने प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतूदीनुसार त्यांना निलंबित केले आहे. प्रशासनाने या प्रकरणी आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी, असा निर्देश ही महासभा देत आहे.<br>**अनुमोदक :- (कांता पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६. | **श्री.धरमवीर भोलाराम लोहट,सफाई कामगार प्रभाग समिती एच,नवघर मणिकपूर यांचा वारस मुलगा श्री.दिपक धरमवीर लोहट यांस वारसाहक्क पध्दतीने महानगरपालिका सेवेत सामावुन घेणेबाबत.** | **ठराव/निर्णय :-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सफाई-२०१५/प्र.क्र.२६८/ महामंडळे, दिनांक ११/०३/२०१६ नुसार लाड समितीचे शिफारसीनुसार वारसा हक्क पद्धतीने श्री.धरमवीर भोलाराम लोहट यांचा वारस मुलगा श्री.दिपक धरमवीर लोहट यांस महानगरपालिकेच्या सेवेत 'सफाई कामगार' या पदावर नियुक्ती देण्यास आजची ही महासभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (नितिन राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७. | **आर. सी. एच. फेज-२ उपक्रमांतर्गत मिळत असलेले कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांप्रमाणे (शासन धोरणनुसार समान काम समान वेतन ) मिळणेबाबत.** | **ठराव/निर्णय :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आर.सी.एच. फेज- २ उपक्रमांतर्गत विविध पदावर माहे फेब्रुवारी, २०१२ पासून ११ महिन्यांच्या कंत्राटी तत्वावर २४ कर्मचारी कार्यरत असून त्यांना मिळणारे मानधन कमी असल्याने महानगरपालिकेकडून सन २०१२ मध्ये वाढीव मानधन देण्यात आले होते. महानगरपालिकेने कंत्राटी तत्वावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना दि. १/०४/२०१७ पासून नियमित वेतनश्रेणीच्या ९० % वेतन देणेस मा. महासभा, ठराव क्र. १४, दि. २० फेब्रुवारी, २०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्या निर्णयानुसार आर.सी.एच. फेज- २ मध्ये कार्यरत असलेले कर्मचारी हे महानगरपालिकेच्या मंजूर पदांच्या समकक्ष पदावर कार्यरत असल्याने त्यांना महानगरपालिकेच्या सुधारीत धोरणानुसार नियमित वेतनश्रेणीच्या ९० % वेतन अदा करणेस व त्यावर होणारे भविष्य निर्वाह निधी अंशदान १३.३६ % अदा करणेस आजची ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रविण शेट्टी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८. | **अग्निशमन विभागातील मंजूर रिक्त पदे.** | **ठराव/निर्णय :-** उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. शासनाने सेवा प्रवेश नियम मंजूर केल्यानंतर प्रशासनाने अग्निशमन विभागातील मंजूर रिक्त पदे विहित पध्दतीने भरणची कार्यवाही करावी.<br>**अनुमोदक :- (संजय पिंगूळकर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ९. | **अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियामक मंडळाच्या निवडणूकीसाठी तयार करावयाच्या मतदार यादीत महानगरपालिकेच्या ०३ सदस्यांची प्रतिनिधी म्हणून शिफारस करणेबाबत.** | **ठराव/निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियमावलीतील नियम २(ए),(बी) आणि ६ नुसार तयार करावयाच्या मतदार यादीत समावेश करण्यासाठी निवडून आलेल्या सदस्यांमधील खालील ३ सदस्यांची नांवे सन्मा.महापौर महोदया यांनी सभागृहात वाचुन जाहीर केली.<br>१. नितीन दिनानाथ राऊत<br>२. प्रविण चिन्नया शेट्टी<br>३. संजय दिगंबर पिंगुळकर<br>उपरोक्त तिनही सदस्यांची नावे अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या तयार करावयाच्या मतदार यादीत समावेश करण्यासाठी संस्थेस कळविण्यांत यावी अशी आजची सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज ठाकूर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १०. | **सन २०१७-१८, सन२०१८-१९, सन २०१९-२० हया वित्तिय वर्षासाठी अग्निशमन विभागाकडील वाहने साहित्यासह देखभाल दुरुस्ती करणेस प्रशासकिय व वित्तिय मंजुरी मिळणे बाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** अग्निशमन विभागाकडील वाहने साहित्यासह देखभाल दुरुस्ती करणे बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. अग्निशमन वाहने अत्यावश्यक सेवेत वापरात असल्याने देखभाल दुरुस्तीसाठी फार वेळ लागू नये तसेच वाहने सदैव सुरळीत रहावीत याकरीता वाहनांची सर्व प्रकारची देखभाल दुरुस्ती, पंक्चर, डेंटिग, पेंटिग, टायर, बॅटरी बदलणे, इंजिन दुरुस्तीची सर्व कामे, इत्यादीसह अग्निशमन विभागाकडे असलेली ७ बुलेट, २ बोलेरो व १५ फायर टेंडर इत्यादी वाहनांची<br>साहित्यासह सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या तीन वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती करणेस व त्यासाठी येणा-या रुपये ९२,६५,१८५/- चे खर्चास व ई-निविदा मागवुन दुरुस्ती काम ठेका पध्दतीने करण्यास हि सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रविण शेट्टी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ११. | **अग्निशमन विभागाकरीता अग्निशमन वाहने, अग्निशमन व आपत्कालीन साधन सामुग्री खरेदी करणेबाबत.** | **निर्णय :-** प्रस्तावित केल्यानुसार अग्निशमन विभागाकरीता अद्ययावत साधनसामुग्री खरेदी बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. अहवालात नमूद केलेल्या वाहनांसह प्रस्तावित असलेल्या ६ रुग्नवाहिका ऐवजी ४ रुग्नवाहिका तसेच २ आगीमुळे भाजलेल्या रुग्णांना त्वरीत उपचारासाठी नेणे सोयीस्कर व्हावे याकरीता पॅरामेडिकल रुग्णवाहिका वाहने असणे आवश्यक आहे. त्यासाठी अग्निशमन विभागाकरीता -<br>१) इमरजन्सी रेस्क्यू टेंडर/हॅझमॅट व्हॅन साहित्यासह - १ नग<br>२) वॉटर बाऊझर साहित्यासह - ४ नग<br>३) रॅपिड इंटरव्हेंशन व्हेईकल (जलद हस्तक्षेप वाहन) - २ नग<br>४) रुग्णवाहिका - ४ नग |

५) पॅरामेडिकल रुग्णवाहिका - २ नग
६) वॉटर बाऊझर विथ टॉवर मॉनिटर - १ नग
७) वॉटर टेंडर टाईप 'बी' अग्निशमन वाहने - ३ नग
८) अग्निशमन व आपत्कालीन विविध प्रकारची साधन सामुग्री

इत्यादी अद्ययावत अग्निशमन वाहने व साधन सामुग्री खरेदी करण्यांस व त्यासाठी येणा-या रक्कम रु. १८ कोटी पर्यंतचे खर्चास हि सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

**अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

---

**१२.**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० अन्वये विशेष विषय समितीची स्थापना.**
**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१-अ (२) अन्वये प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशनाद्धारे समिती सदस्यांची नियुक्ती करणे.**

**ठराव/निर्णय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० अन्वये स्थापन केलेल्या वैदयकिय सहाय्य व आरोग्य समितीवर नामनिर्देशनाद्धारे ०९ सदस्यांच्या नेमणूक करणेकामी कलम ३१ - अ (२) अन्वये दि. १५/०६/२०१७ रोजी गटनेत्यांची बैठक आयोजित करुन पक्षिय बलाबल निश्चित करुन देण्यात आलेले आहे.नोदंणीकृत गटांचे पक्षिय बलाबलानुसार बहुजन विकास आघाडी या गटाकडून ०९ सदस्यांच्या नेमणूका होणे अपेक्षित आहे. करीता बहुजन विकास आघाडीचे गटनेते श्री अब्दुल हक सुलेमान पटेल यांनी खालील नमुद सदस्यांची सदर समितीवर सदस्य म्हणून नेमणूक करणेची शिफारस केलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ प्रविण हिराजी शिरसागर | २. | संतोष दत्ताराम वळवईकर |
| ३. | महेश हरि पाटील | ४. | लॉरेल डायगो डायस |
| ५. | राजेंद्र राजाराम कांबळी | ६. | कन्हैया मनोहर भोईर |
| ७. | झिनत अक्रम शेख | ८. | विजया अजित भोईर |
| ९. | भुपेंद्र आत्माराम पाटील | | |

सबब वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नव्याने स्थापित झालेल्या वैदयकिय सहाय्य व आरोग्य समितीवर १. डॉ प्रविण हिराजी शिरसागर २. संतोष दत्ताराम वळवईकर ३. महेश हरि पाटील ४. लॉरेल डायगो डायस ५. राजेंद्र राजाराम कांबळी ६. कन्हैया मनोहर भोईर ७. झिनत अक्रम शेख ८. विजया अजित भोईर ९. भुपेंद्र आत्माराम पाटील हयांच्या नामनिर्देशनाद्धारे नेमणूक करण्यास आजची सर्वसाधारण सभा मान्यता प्रदान करीत आहे.

**अनुमोदक :- (पंकज ठाकूर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

| | | |
|---|---|---|
| १३. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील स्मशानभूमीची दैनंदीन सुरक्षा देखभाल व इतर सर्व कामे करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देवून E.O.I. स्वारस्याची अभिरुची प्रसिधदीस देणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वर प्रस्तावित केलेल्या विविध स्मशानभुम्यासह अतिरीक्त आगाशी, नवापूर व नायगांव येथील स्मशानभुमिची दैनंदिन सुरक्षा व देखभाल करणे कामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून (E.O.I) (स्वारस्याची अभिरुची) प्रसिध्दीस देणेस मान्यता देत आहे. ठराव सर्वानुमते मंजूर<br>**अनुमोदक :- (रूपेश जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १४. | जि.प. शाळेतील मुलांना प्रत्येकी वैयक्तिक क्रिडा साहित्य वाटप करणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यांत आली सदरचा प्रस्ताव तुर्तास स्थगित ठेवावा अशी आजची सभा ठरावित असून प्रस्ताव माहिला व बालकल्याण समिती सभेच्या विचार विनिमयासह सर्वसाधारण सभेपुढे निर्णयासाठी सादर करावा अशी आजची सर्वसाधारण सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- (विद्या पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १५. | प्रभाग समिती आय मधील वॉर्ड क्र ७१ मधील अग्रवाल सिटी मधील अंतर्गत रस्ते खडीकरण व डांबरीकरण करणेच्या कामास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. (सध्याचा प्रभाग 'एच' प्रभाग क्रमांक .९५) | **ठराव/निर्णय :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. प्रभाग समिती "आय" मधील वॉर्ड क्र. ७१ मधील अग्रवाल सिटी मधील अंतर्गत रस्ते खडीकरण व डांबरीकरण करणे. (सद्या प्रभाग एच प्रभाग क्र. ९५) वरील कामी तयार करणेत आलेल्या रु.९७,६७,४८३/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून सदरचे काम मुळ ठेकेदाराकडून पूर्ण करुन घेणे उचित होईल त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (नितीन राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १६. | वसई विरार शहर महानगरपालिका ९ प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील उद्यानांचे देखभाल व रखरखावाचे काम शहरातील नोंदणीकृत महिला बचत गटांना एक वर्षाकरिता मुदतवाढ देणेत आलेल्या कार्यवाहीच्या प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी तसेच प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय -** उपरोक्त विषयाबाबत सभेत चर्चा करणेत आली. झालेल्या चर्चेनुसार वसई विरार शहर महानगरपालिका ९ प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील उद्यानांचे देखभाल व रखरखावाचे काम शहरातील नोंदणीकृत महिला बचत गटांना एक वर्षाकरिता मुदतवाढ देणेत आलेल्या कार्योत्तर मंजुरीच्या प्रस्तावास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| १७. | केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील अतिरीक्त पाणी पुरवठा वितरण व्यवस्था योजना अतिरीक्त कामाच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत. | ठराव / निर्णय - वरील प्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील अतीरीक्त पाणी पुरवठा वितरण व्यवस्था योजना अतीरीक्त कामाच्या खर्चास सुधारीत प्रशासकीय वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (भरत मकवाना) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १८. | मौजे बोळींज सर्व्हे नं. ४०१ येथील शहरी बेघरांना निवारा केंद्र बांधणे कामी प्रस्तावीत केलेल्या जागेत बदल करुन मौजे मोरे येथील सर्व्हे नं. १३४ मध्ये प्रस्तावित करण्यांबाबत . | ठराव/निर्णय :- वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होउन मौजे बोळींज सर्व्हे नं. ४०१ येथील शहरी बेघरांना निवारा केंद्र बांधणे कामी प्रस्तावित केलेल्या जागेत बदल करुन मौजे मोरे येथील सर्व्हे नं. १३४ मध्ये प्रस्तावित करण्याबाबत तसेच अंदाजपत्रक व नकाशात बदल नसल्याने सदरचे काम मुळ ठेकेदाराकडून करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (सखाराम महाडीक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १९. | सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२०, या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा उसगाव/शिरवली उद्‌भव २० द.ल.ली. व पापडखिंड १ द.ल.ली. क्षमता योजनेतील सब स्टेशन, इलेक्ट्रीक पॅनल, पंपींग मशिनरी व जल शुध्दीकरण केंद्रामधील यांत्रिकी बाबींची देखभाल दुरुस्ती करणे या कामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास अर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणे बाबत. | ठराव / निर्णय :- वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामास अंदाजीत रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे व पुढील निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रकाश रॉड्रीक्स) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २०. | सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२०, या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना उसगाव/शिरवली उद्‌भव २० द.ल.ली. तसेच पापडखिंड १ द.ल.ली. क्षमता योजना चालवीणे व | ठराव / निर्णय :- उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होवुन असे ठरविण्यांत आले की, विषयांकीत प्रस्तावास यापुर्वी दि. १३/०४/२०१७, ठ.क्र. ९ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर ठरावाच्या प्रस्तावणेत वरिलप्रमाणे यांत्रिकी कामाचा उल्लेख झाला आहे तो उल्लेख वगळुन दि. १३/०४/२०१७ ठ.क्र. ९ मधील ठरावात अंशत: बदलास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रविण शेट्टी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| | जलवाहीन्यांची देखभाल दुरुस्ती करणे या कामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास अर्थिक व प्रशासकीय मंजूरी दिंनाक १३/०४/२०१७ विषय क्र. ०९ अन्वये दिली आहे त्या ठरावात अंश:ता बदलास मान्यता मिळणेबाबत. | |
| २१. | केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजने अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात अतिरीक्त पाणी पुरवठा योजना करणेकामी मंजूर विकास आरखडयामध्ये पाण्याची टाकी/ जलकुंभ (ESR) चे नविन आरक्षण प्रस्तावित करणे करीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार कार्यवाही करणे बाबत. | **ठराव/निर्णय :-** वरिल प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे केंद्रशासन पुरस्कृत अमृत अभियान योजने अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अतिरिक्त पाणीपुरवठा योजना तयार करणेकामी गाव मौजे-विरार, स.नं-१६२, हि.नं-४ ब, क्षेत्र १६०० चौ.मी. तसेच गाव मौजे-गोखिवरे, स.नं-११३ पैकी क्षेत्र-१६०० चौ.मी. येथील शासकिय जागेवर पाण्याची टाकी/जलकुंभ (ESR) बांधणेकामी सदर जागेवर पाण्याची टाकी/जलकुंभ (ESR) चे नविन आरक्षण प्रस्तावित करणेसाठी (नकाशा क्र. VVCMC/MOD No.०१ & ०२/२०१७-१८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) वसई-विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखडयामध्ये बदल करुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणेस तसेच सदर जागा शासनाकडून उपलब्ध करुन घेण्याकरिता व नविन आरक्षणाप्रमाणे विकसित करणेस, ही सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २२. | वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवर सिस्टम मॅनेजर (ई-प्रशासन) हे मंजूर रिक्त पद सरळ सेवेने भरणे बाबत. | **ठराव/निर्णय :-** नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक वविम-१९११/प्र.क्र.६४९/नवि-२३, दि. ०१ सप्टेंबर, २०१४ सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. त्यामध्ये सिस्टम मॅनेजर (ई-प्रशासन) हे पद मंजूर करण्यात आले आहे. सदर पद सध्या रिक्त आहे. या पदाची वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० ग्रेड पे रु. ४४०० अशी आहे. शासनाच्या दि. ०९ सप्टेंबर, २०१४ च्या अधिसुचनान्वये "वसई-विरार शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गिकरण) नियम, २०१४" अन्वये सेवा प्रवेश नियमांना मान्यता दिलेली आहे. या सेवाप्रवेश नियमानुसार सिस्टम मॅनेजर (ई-प्रशासन) या पदाची शैक्षणिक अर्हता, पात्रता व अनुभव खालीलप्रमाणे आहे. |

| अ. क्र. | पदाचे नाव | अर्हता, पात्रता व अनुभव |
|---|---|---|
| १ | सिस्टिम मॅनेजर (ई-प्रशासन) | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची संगणक अभियांत्रिकीमधील पदवी (B.E. Computer) किंवा समकक्ष अर्हता<br>ब) डेटा सेंटर ॲडमिनिस्ट्रेशन, नेटवर्कींग (लॅन, वॅन, Compount) हार्डवेअर मधील ०५ वर्षाचा अनुभव |

सिस्टिम मॅनेजर (ई-प्रशासन) पद हे एकाकी पद असल्याने त्यास सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय, दि. २१ सप्टेंबर, १९९८ अन्वये एकाकी पदांना आरक्षण लागू होत नाही. तरी माहिती व तंत्रज्ञान विभागातील कामाची निकड लक्षात घेता सिस्टिम मॅनेजर (ई-प्रशासन) हे मंजूर रिक्त पद सरळसेवेने विहीत पध्दतीने भरणेसाठी आजची ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**अनुमोदक :- (निलेश देशमुख) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

नगरसचिव

वसई -विरार शहर महानगरपालिका